१६ जुलै २००२
पुढारी

# कमला कॉलेजच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात

कोल्हापूर, दि. १६ : ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमधील माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.

यावेळी उपस्थित माजी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. पाटील म्हणाले की, जीवनाभिमुख आणि दर्जेदार अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना देणे हे शिक्षण संस्थांचे कर्तव्य आहे. कमला कॉलेजच्या माजी विद्यार्थिनी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा लाभ आमच्या आजी विद्यार्थिनींना करून द्यावा व त्याबाबत वेगवेगळे उपक्रम राबवावेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. सौ. मंजुषा पाटील यांनी केले. डॉ. व्ही. व्ही. मैंदर्गी व प्रा. सुनिता काळे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले, प्रा. कविता बागवे यांनी आभार मानले.